# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.५७५८/२१/अ.क्र.४६६/२५/०१
## क्र. मुमाआ/नों.क्र.५७५९/२१/अ.क्र.४६७/२५/०१

**Miss. Ayman Shaikh**
Room No. 1, Chawl No. 16, Hayat Mohd Chawl,
Parsiwadi, Ghatkopar (W) Mumbai – 400086.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता जलकामे (बांधकामे) शहर**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप जल अभियंता (बांधकामे) यांचे कार्यालय,
१रा मजला, अभियांत्रिकी हब कार्यालय इमारत, वरळी यानगृह इमारत,डॉ. ई.मोझेस रोड,
वरळी नाका,वरळी, मुंबई ४०० ०१८.

**प्रथम अपिलीय तथा कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे) शहर**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप जल अभियंता (बांधकामे) यांचे कार्यालय,
१रा मजला, अभियांत्रिकी हब कार्यालय इमारत, वरळी यानगृह इमारत,डॉ. ई.मोझेस रोड,
वरळी नाका,वरळी, मुंबई ४०० ०१८.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२५</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २३.११.२०२० | १४.१२.२०२० | २९.१२.२०२० | - |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.०५.२०२१ रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "Works of Hirani Enterprises SCR No. ६१९ dated ०२.०८.२०१८" याबाबत माहितीची मागणी केली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.१२.२०२० "अपीलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे निरिक्षण करुन योग्य ते शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल", असे उत्तरान्वये कळविण्यात येईल.

त्यानंतर अपीलार्थी यांनी दि.२९.१२.२०२० रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "Information Officer refused to supply information as PIO invited me to inspect the

documents. Hence I have no requirement for inspection", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतली नसून आदेश पारित केले नाही.

तद्नंतर अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि. १४.०५.२०२१ रोजी "Information officer refused to supply information", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि. ०८.०५.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता जलकामे (बांधकामे) शहर, श्री. प्रविण कातकडे व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे) शहर, श्री. विजयकुमार आष्टनकर उपस्थित आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता जलकामे (बांधकामे) शहर, श्री. प्रविण कातकडे व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे) शहर, श्री. विजयकुमार आष्टनकर यांनी आयोगास सादर केले की, अपीलार्थी यांना यापूर्वीच माहिती उपलब्ध करुन देण्यता आली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.१२.२०२० रोजी कार्यालयात स्वत: उपस्थित राहून उपलब्ध माहितीचे निरिक्षण करुन योग्य ते शुल्क भरल्यानंतर माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थीस कळविले होते. त्यानुसार अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेतल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना यापुर्वीच प्रदान झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२५**

State Information Commission Maharashtra